( for website )


महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय
कोकण भवन (विस्तारीत), ३ रा मजला, सी.डी.बी.,बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
संकेतस्थळ:www.mahaswayam.gov ई मेल-dese.desk९@gmail.com
दूरध्वनी क्रमांक -२७५७ १९४२ / ४४


जा.क्र.कौविरोवउआ/

दि.१६.०४.२०२५

**जागतिक बँक सहाय्यीत मानवी विकासासाठी उपयोजीत ज्ञान आणि कौशल्य विकास प्रकल्प**
World Bank assisted Development of Applied Knowledge and Skills for Human Development Project (WBA/DAKSH)

**केंद्रीय तथा राज्य शासकीय सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी सेवा करार (कंत्राटी) पध्दतीने प्रकल्पासाठी घेणेबाबत.**

राज्यातील व्यावसायीक शिक्षण व कौशल्य विकास करणाऱ्या परिसंस्थांमधुन आवश्यक पायाभुत सुविधांच्या बळकटीकरणासाठी तसेच, नविनतम तंत्रज्ञानावर आधारीत कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी राज्यशासनाच्या कौ. रो. उ. व ना. विभागामार्फत जागतीक बँकेच्या सहाय्याने दक्ष हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. या प्रकल्पासाठी शासन सेवेत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून तसेच, सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून या जाहिरातीत नमुद पदांसाठी निवडसुची तयार करण्याकरीता अर्ज व संमतीपत्र मागविण्यात येत आहे.

**अ. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी-**

या प्रकल्पात काम करण्यास इच्छुक असलेल्या सेवानिवृत्त् अधिकारी व कर्मचारी यांनी संकेतस्थळावर नमुद विवक्षीत अनुभव व अर्हता असणे आवश्यक आहे. या कामाचे पारीश्रमीक अटी व शर्ती, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३. दि.१७/१२/२०१६ व दि. ८/९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

**ब. सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी-**

या प्रकल्पासाठी काम करण्यास इच्छुक असलेल्या पात्र अधिकारी व कर्मचारी यांनी विहीत पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. तथापी या प्रकल्पात काम करण्यास इच्छुक असल्याचे संमतीपत्र जाहिरात निर्गमित झाल्यापासुन दहा दिवसांच्या आत मा. आयुक्त तथा प्रकल्प संचालक यांच्याकडे सादर करणे अनिवार्य राहिल

| अ.क्र. | प्रकल्पासाठी आवश्यक पदे | एकुण पदे | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प विशेषज्ञ- (प्रशिक्षण मुल्यांकन) Project specialist (Training and Assessment) | १ | ११ महिने |
| २ | प्रकल्प विशेषज्ञ - (उद्योजकता, नाविन्यता व | १ | ११ महिने |

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

| | | | |
|---|---|---|---|
| | स्टार्टअप) Project specialist (Entrepreneurship, Innovation and Startup) | | |
| ३ | प्रकल्प विशेषज्ञ- (उद्योग संबंध प्लेसमेंट, ओजीटी आणि प्रशिक्षणार्थी) - Project specialist (Industry linkages Placement, OJT and Apprenticeship) | ३ | ११ महिने |
| ४ | प्रकल्प विशेषज्ञ- (निरीक्षण व मुल्यमापन) Project specialist (Monitoring and Evaluation) | १ | ११ महिने |
| ५ | प्रकल्प विशेषज्ञ- (स्थापत्य कामे) Project specialist (Civil works) | १ | ११ महिने |
| ६ | कायदा/विधी विशेषज्ञ Specialist (Law/Judicial) | १ | ११ महिने |
| ७ | अदिवासी विकास विशेषज्ञ Specialist Tribal | १ | ११ महिने |
| ८ | वित्त अधिकारी Finance officer | १ | ११ महिने |
| ९ | प्रकल्प विशेषज्ञ- (खरेदी) Project specialist (Procurement) | १ | ११ महिने |
| १० | प्रकल्प विशेषज्ञ- (महिला बालकल्याण व समावेशन) Project specialist (Women Child welfare & Inclusion) | १ | ११ महिने |
| ११ | कक्ष अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी Desk Officer | ३ | ११ महिने |
| १२ | लघुलेखक Stenographer | २ | ११ महिने |

www.MHAlerts.Com

उमेदवारांनी आपले अर्ज **आयुक्त तथा पदसिध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी तथा प्रकल्प संचालक राज्य प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय, १ मजला, धोबी तलाव मुंबई -४००००१** यांच्याकडे टपालाद्वारे किंवा वर ceo@mssds.in या ई-मेलवर सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.१७.०४.२०२५ रोजीपासून ते दि.२८.०४.२०२५ पर्यंतच्या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस सोडून सकाळी ९:४५ ते सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत सादर करावे

१. वेतनमान : सेवानिवृत्तीच्या वेळेस असणाऱ्या वेतन व शासन निर्णयाप्रमाणे
२. वय : ६५ पर्यंत
३. शैक्षणिक अर्हता व अनुभव: सहपत्रात नमुद केल्याप्रमाणे
४. प्राधान्य : जागतिक बँक प्रकल्प केंद्रपुरस्कृत योजना अंमलबजावणीचा अनुभव

उमेदवाराने अर्जासोबत स्वतःचा अलिकडचा पासपोर्ट साईज फोटो, अर्हता प्रमाणपत्रांच्या तसेच राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी PPO ची छायांकित प्रत, शैक्षणिक अर्हता व अनुभव यांच्या प्रमाणित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. त्याचप्रमाणे संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी नमूद

More info: MHAlerts.Com

करण्यात यावा. अर्जासोबत स्वतःचा पत्ता लिहिलेला व पुरेसा पोस्टेज असलेला लिफाफा जोडावा. तसेच उत्कृष्ट काम केले असल्याबाबत काही प्रमाणपत्र असल्यास ते जोडावे.

(i) वर नमूद प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज करणे अपेक्षित आहे.

(ii) वरील नमूद पदांपैकी काही पदे आवश्यकतेनुसार भरण्यात येतील अथवा वाढविण्यात येतील.

(iii) प्रकल्पाच्या कालावधीनुसार/कामाच्या मुल्यमापनानुसार कराराची मुदत वाढविण्यात येईल.

(iv) प्रकल्पाचे मुख्यालय मुंबई/विभागीय मुख्यालय असुन गरजेनुसार विभागीय मुख्यालय आणि जिल्हा कार्यायलयात काम करणे आवश्यक राहिल. उमेदवारांनी आपला प्राधान्यक्रम कळविणे आवश्यक राहिल.

अधिक माहितीकरिता विभागाच्या वेबसाईट https://kaushalya.mahaswayam.gov.in येथे भेट द्यावी.

सही/- (नितीन पाटील), भा.प्र.से.
आयुक्त, कौ.वि.रो व उ आयुक्तालय
तथा
प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन
कक्ष (दक्ष)

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

# सहपत्र

१. **प्रकल्प विशेषज्ञ- (प्रशिक्षण मुल्यांकन)**

Project specialist (Training and Assessment) – १ पद

- शैक्षणिक पात्रता- अभियांत्रीकी पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत गट अ/गट अ (कनिष्ठ) तांत्रिक संवर्गातील सहा.संचालक/प्राचार्य/निरीक्षक या पदावर काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- जागतीक बँक सहाय्यीत प्रकल्प/केंद्रपुरस्कृत योजनांच्या अमंलबजावणीचा अनुभव

२. **प्रकल्प विशेषज्ञ – (उद्योजकता, नाविन्यता व स्टार्टअप) – १ पद**

Project specialist (Entrepreneurship, Innovation and Startup)

- शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत गट अ/गट अ (कनिष्ठ) तांत्रिक संवर्गातील सहा. आयुक्त/ उप आयुक्त/ सहा. संचालक/प्राचार्य/ निरीक्षक पदावर काम केल्याचा किमान ८ एकत्रित वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या योजनांमध्ये अंमलबजावणीचा प्रत्यक्ष अनुभव

३. **प्रकल्प विशेषज्ञ- (उद्योग संबंध प्लेसमेंट, ओजीटी आणि प्रशिक्षणार्थी) – ३ पद**

Project specialist (Industry linkages Placement, OJT and Apprenticeship)

- शैक्षणिक पात्रता- कृषी/अभियांत्रीकी/वाणिज्य/वैद्यकीय/सांख्यिकी/अर्थशास्त्र/मानसशास्त्र पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत गट अ/गट ब तांत्रिक संवर्गातील उप संचालक/ सहा. संचालक/प्राचार्य/निरीक्षक/सहा. आयुक्त/ उप आयुक्त/ कौशल्य विकास आधिकारी या पदावर काम केल्याचा किमान ८ वर्षाचा एकत्रित अनुभव
- प्राधान्य- शिकाऊ उमेदवारी रोजगार मेळावे व उद्योगधंदे समन्वय यात अंमलबजावणीचा अनुभव

४. **प्रकल्प विशेषज्ञ- (निरीक्षण व मुल्यमापन) – १ पद**

Project specialist (Monitoring and Evaluation)

- शैक्षणिक पात्रता- अभियांत्रीकी पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत गट अ/गट अ (कनिष्ठ) तांत्रिक सेवेत उप संचालक/ सहा. संचालक/प्राचार्य/निरीक्षक/सहा.

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

प्रशिक्षणार्थी/ सल्लागार या पदावर काम केल्याचा किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव

- प्राधान्य- प्रकल्प अंमलबजावणी/संस्था निरीक्षणाचा अनुभव

५. **प्रकल्प विशेषज्ञ- (स्थापत्य कामे) - १ पद**

Project specialist (Civil works)

- शैक्षणिक पात्रता- स्थापत्य अभियांत्रीकी पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतून गट अ संवर्गात अधिक्षक अभियंता किंवा कार्यकारी अभियंता/उप कार्यकारी अभियंता पदावर काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- १. जागतीक बँक सहाय्यीत प्रकल्प/ केंद्रपुरस्कृत योजनांच्या निधीद्वारे त्यांच्या मानकाप्रमाणे बांधकामे विहीत वेळेत पुर्ण करण्याचा अनुभव
  २. ग्रिन बिल्डींग/ सोलर पॅसिव्ह बिल्डींग बांधकामाचा अनुभव

६. **कायदा/विधी विशेषज्ञ - १ पद**

Specialist (Law/Judicial)

- शैक्षणिक पात्रता- पदवी+L.L.B/L.L.M
- अनुभव- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत गट अ/गट अ (कनिष्ठ)/गट ब संवर्गात सहा. संचालक (अतांत्रीक)/विधी अधिकारी/विधी व न्याय अधिकारी इत्यादी पदावर किंवा समकक्ष पदावर काम करण्याचा किमान ८ वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव

७. **अदिवासी विकास विशेषज्ञ- १ पद**

Specialist (Tribal Development)

- शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- राज्यसेवेतून गट अ संवर्गात काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- आदिवासी विकासासाठी विविध योजनांच्या अंमलबजावणीचा अनुभव/प्रत्यक्ष अदिवासी क्षेत्रात काम करण्याचा अनुभव

८. **वित्त अधिकारी- १ पद**

Finance officer

- शैक्षणिक पात्रता- पदवी
- अनुभव- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट अ/गट ब मध्ये लेखा व वित्त अधिकारी वा समकक्ष पदावर काम करण्याचा किमान ८ वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- जागतीक बँक सहाय्यीत प्रकल्प/ केंद्रपुरस्कृत योजनांच्या वित्त विषयक बाबीच्या

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

जसे की, अंतर्गत व बाह्य लेखापरीक्षण, उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे, वार्षिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे इ. बाबींचा अनुभव.

**९. प्रकल्प विशेषज्ञ- (खरेदी) - १ पद**

Project specialist (Procurement)

- शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- राज्यसेवेतून गट अ संवर्गात काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- जागतीक बँक सहाय्यीत प्रकल्प/ केंद्रपुरस्कृत योजनांच्या निधीद्वारे त्यांच्या मानकाप्रमाणे यंत्रसामुग्री खरेदीचा, निविदा तयार करणे, तसेच विहीत वेळेत खरेदी प्रक्रियेची संपुर्ण अंमलबजावणी करण्याचा अनुभव

**१०. प्रकल्प विशेषज्ञ- (महिला बालकल्याण व समावेशन) - १ पद**

Project specialist (Women Child welfare & Inclusion)

- शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- राज्यसेवा गट अ/गट ब संवर्गात काम केल्याचा किमान एकत्रित १० वर्षाचा अनुभव
- प्राधान्य- महिला व बालकल्याण क्षेत्रातील विविध योजना अंमलबजावणीचा अनुभव

**११. कक्ष अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी- ३ पदे**

Desk Officer/Administrative officer

- शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर पदवी
- अनुभव- राज्यसेवा गट ब/गट क संवर्गात काम केल्याचा किमान एकत्रित १० वर्षाचा अनुभव

**१२. लघुलेखक- २ पदे**

Stenographer

- शैक्षणिक पात्रता- पदवी/पदव्युत्तर पदवी (Speed 100w/m Marathi & English)
- अनुभव- किमान ५ वर्षाचा अनुभव

सही/- (नितीन पाटील), भा.प्र.से.
आयुक्त, कौ.वि.रो व उ आयुक्तालय
तथा
प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन
कक्ष (दक्ष)

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

| सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी करारपद्धतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज | | | पासपोर्ट साइज फोटो |
|---|---|---|---|
| अ.क्र. | माहिती | तपशिल | |
| १. | उमेदवारांचे संपुर्ण नाव | | |
| २. | पत्र व्यवहाराचा पत्ता व ई-मेल | | |
| ३. | दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| ४. | जन्मदिनांक व वय | | |
| ५. | सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीच्या वेळेस धारण केलेले पद | | |
| ६. | प्रवर्ग/गट व वेतनश्रेणी | | |
| ७. | सेवानिवृत्तीचे वेतन घेत असलेल्या बँकेचे नांव व खाते क्रमांक | | |
| ८. | शैक्षणिक अर्हता | | |
| ९. | संगणक व इतर अर्हता | | |
| १०. | शासकीय कामकाजाचा अनुभव (याबाबत पदनाम कालावधी व केलेल्या कामाचा तपशिल नमुद करावा.) | | |
| ११. | यापुर्वी केंद्रपुरस्कृत योजना/जागतीक बँक प्रकल्पात काम केला असल्यास त्याचा तपशिल | | |

www.MHAlerts.Com

- प्रमाणित करण्यात येते की उपरोक्त नमूद माहित्ती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहिती असत्य/चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे.
- कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची (विवक्षीत कालावधीकरीता) असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणा अधिकार हक्क निर्माण होत नाही.

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक:

स्थळ:

*वरीलप्रमाणे नमुद सर्व कागदपत्रांच्या स्वक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

More info: MHAlerts.Com